दिनांक-१४/१०/२०१३

कुळगांव बदलापुर नगरपरिषद
आवक क्र.:१४६९५ दिनांक: १४/१०/२०१३
संबंधीत खाते: नरवि
वेळ
निपटारा मुख्याधिकारी

प्रति,
मा. मुख्याधिकारी,
कुळगांव बदलापुर नगरपरीषद
बदलापुर.

**विषय- सर्व्हे नं.७, हि. नं.पैकी१, मौजे खरवई, ता. अंबरनाथ येथील मिळकतीबाबत त्वरित बांधकाम थांबविणे बाबत.....**

**संदर्भ-** आपला जावक क्रं.कुबनप/नरवि/२०११/२०१३-२०१४ दि. २६/०६/२०१३.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मौजे खरवई येथील सर्व्हे नं.७, हि. नं.पैकी/१, एकुण क्षेत्र १हेक्टर ९३आर ७प्रति पैकी ६० गुंठे इतके क्षेत्र हे श्री. श्रीनिवास वामन ओक व श्री. प्रभाकर वामन ओक यांनी श्रीमती चरुबाई हरिचंद्र धुमाळ यांना दिनांक ०७/१२/२००९ च्या खरेदीखताने दिले सदय परिस्थीतीत सदरहू येथे उल्लेख केलेल्या मिळकतीचा सात बाराचा उतारा हा एकच असुन त्याची पोट फोड झालेली नाही. अश्या परिस्थितीत खरेदीखताने न दिलेल्या क्षेत्रावर श्री. श्रीनिवास वामन ओक व श्री. प्रभाकर वामन ओक यांची संमत्ती घेतलेले नाही. तसेच कायदेशीर हद्दी निश्चित केलेल्या नसताना बांधकाम परवानगी मिळवून मेसर्स श्रुतिका कन्स्ट्रक्शन यांनी बांधकाम सुरु केलेले आहे.

सदय परिस्थितीत कुळगाव बदलापुर नगरपरिषदेने दिलेल्या बांधकाम परवानगी नुसार जागेवर प्रत्यक्ष बांधकाम चालु नसुन आपण कृपया प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन याबाबत प्रत्यक्ष नोंद घ्यावी. तसेच त्यानुसार आपण योग्य ती कायदेशीर कारवाई करुन सदरहु मिळकतीवर चालु असलेले बांधकाम थांबवावे ही विनंती.

नरवि
२०२९
१५/१०/१३

क्षिमाने
23/10

आपला विश्वासु

Kohari

श्री. अजम युसूफ कोहारी
(श्री. श्रीनिवास वामन ओक व
श्री. प्रभाकर वामन ओक यांचे
कुलमुखत्यार धारक)